**परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ.एस.जयशंकर अमेरिका भेटीवर (30 जून – 02 जूलै, 2025)**

29 जून 2025

1. अमेरिकन परराष्ट्र मंत्री श्री. मार्को रुबियो यांच्या निमंत्रणावरुन भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर 30 जून ते 02 जूलै 2025 दरम्यान अमेरिकेच्या औपचारिक भेटीवर असतील. 1 जुलै 2025 रोजी नियोजित असलेल्या क्वाड परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीच्या (QFMM) पुढील आवृत्तीत सहभागी होण्यासाठी हा दौरा असेल.

2. वॉशिंग्टन डी.सी येथे 21 जानेवारी 2025 दरम्यान पार पडलेल्या QFMM दरम्यान पार पडलेल्या चर्चेचा आढाव घेऊन पुढील दिशा निश्चित केली जाईल. तसेच प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवर, विशेषतः इंडो-पॅसिफिक संबंधित घडामोडींवर विचारांचे आदान-प्रदान केले जाईल. भारताच्या वतीने आयोजित केल्या जाणाऱ्या क्वाड नेतृत्व शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवरील विविध क्वाड उपक्रम विषयक प्रगतीचा आढावा घेतील. मुक्त आणि खुल्या इंडो-पॅसिफिकच्या सामायिक दृष्टिकोनाला गती देण्याच्या उद्देशाने नवीन प्रस्तावांवरही मंत्री चर्चा करतील अशी अपेक्षा आहे.

3. 0 जून 2025 रोजी न्यूयॉर्क येथील संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात "द ह्युमन कॉस्ट ऑफ टेररिझम" या प्रदर्शनाचे उद्‌घाटन परराष्ट्र व्यवहार मंत्री करतील. या प्रदर्शनात जगभरातील भयंकर दहशतवादी कृत्यांचे विनाशकारी परिणाम आणि दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाने उचललेल्या पावलांवर प्रकाश टाकला जाईल.

नवी दिल्ली

29 जून 2025